# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

**एक्सप्रेस टॉवर्स, ४ था मजला, नरिमन पॉईंट, मुंबई-२१**

**परिपत्रक क्र.२०१**

क्र .मजीप्रा/सस/तांशा-१/ १७०     दिनांक : ७.२.२००५

**विषय - साठवण तलाव, रस्ते, पूल इ. कामासाठी निविदांतर्गत पूर्व अर्हता अटी.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील नोंदणीकृत कंत्राटदारांनाच अर्हता प्राप्त ठरविण्यांत येते. साहजिकच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील बहुतांश कंत्राटदारांना पाणी पुरवठा व जलनि:सारण कामांचा अनुभव व कौशल्य प्राप्त असते. कांही पाणी पुरवठा योजनांमध्ये साठवण तलाव, रस्ते, पूल या कामांचा समावेश असतो. अशी कामे मुखत्वेकरुन पाटबंधारे विभाग/ सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित असल्याकारणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील सर्वच नोंदणीकृत कंत्राटदारांना या कामांचा अनुभव व कौशल्य नसते. त्यामुळे कामाची गुणवत्ता मिळविण्यासाठी व अशा प्रकारच्या कामासाठी स्पर्धात्मक देकार प्राप्त होण्यासाठी अनुभवी व कुशल असे पुरेसे कंत्राटदार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नाहीत. या अनुषंगाने साठवण तलावाच्या कामाच्या संदर्भात पूर्व अर्हता अटी निश्चित करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. यानुसार या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण / राज्य शासनाच्या पाटबंधारे विभागांकडील योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदार किंवा साठवण तलाव बांधण्याचा पूर्वानुभव असलेल्या कंत्राटदारांशी जॉईंट-व्हेंचर केलेल्या कंत्राटदारांनाही पात्र ठरविण्यांस शासनाने मान्यता दिली असून दि. २.१२.२००४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९९ व्या सभेत संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विषयांकित कामासाठी खाली निर्देशित केल्याप्रमाणे पूर्व अर्हता ठरविण्यांत यावी.

१) साठवण तलाव, पूल, रस्ते या कामासाठी म.जी.प्रा.कडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत कंत्राटदारांस पुरेसा अनुभव असल्यास अशा कंत्राटदारांना पात्र ठरवावे.

२) साठवण तलाव, पूल, रस्ते या कामासाठी म.जी.प्रा./राज्य शासनाच्या संबंधित विभागांकडील योग्य त्या वर्गात नोदणीकृत कंत्राटदार किंवा अशा प्रकारच्या कामांचा पूर्वानुभव असलेल्या कंत्राटदारांशी जॉईंट व्हेंचर केलेल्या कंत्राटदारांनाही पात्र ठरविण्यांत यावे.

वरीलप्रमाणे पूर्व अर्हता ठरवून अनुभवी व कुशल कंत्राटदारांना पात्र ठरविल्यानंतर प्राप्त देकारामध्ये काय बदल घडतो याबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करण्यांत यावी.

(दीपक भसाळे)
**सदस्य सचिव**

..२..

प्रत-

१) मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई-३२

२) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई-३२

३) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

४) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)

५) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

६) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, (सर्व)

सभादा/७.२.०५
TS-१